प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा
आदेश क्रमांक: १५३ सन २०२६, दिनांक: ०४/०७/२०२६

पहा:- १) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनिय पत्र बी (जन) ५६०१/५७/२०२४/१६९७, दिनांक १३/०९/२०२४.
२) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक ११३/२०२६, दिनांक ३०.०५.२०२६.
३) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक १४०/२०२६, दिनांक २२.०६.२०२६.
४) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक १५१/२०२६, दिनांक ०३.०७.२०२६.
५) मा. सल्लागार समितीचा निर्णय दिनांक १५.०६.२०२६.
६) दिनांक ०३.०७.२०२६ रोजीची कार्यालयीन टिपणी व त्यावरील पारीत आदेश.

उपरोक्त मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे संदर्भ क्रमांक ०१ मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या अटी व शर्ती अन्वये या जिल्हयाचे न्यायीक आस्थापनेवर शिपाई पदाची निवड / प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्रमांक ०२ ते ०४ अन्वये जिल्हा न्यायालय, बुलडाणा व त्या अंतर्गत दुय्यम न्यायालयातील रिक्त पदे व चतुर्थ श्रेणी शिपाई संवर्गातील कर्मचाऱ्यांचे विनंती बदली अर्जाच्या अनुषंगाने तसेच, संदर्भ क्रमांक ०५ वरील मा. सल्लागार समितीच्या निर्णयान्वये व संदर्भ क्रमांक ०६ वरील पारीत आदेशान्वये नियुक्ती व स्थलांतराबाबतचा आदेश खालील प्रमाणे पारीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम	नवीन नियुक्ती व स्थळ
०१	श्री. के.बी.लकडे, कनिष्ठ लिपीक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांची आस्थापना.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बुलडाणा यांचे आस्थापनेवर ४ थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बुलडाणा यांचे न्यायालयात श्री. बी.एस.चोपडे यांची पदी शिपाई म्हणुन पदावनतीने.
०२	श्री. आय.आर.गायकवाड, कनिष्ठ लिपीक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांची आस्थापना.	जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे आस्थापनेवर श्री. के.बी.लकडे यांचे शिपाई या पदी पदावनती झाल्याने रिक्त होणाऱ्या पदी कनिष्ठ लिपीक म्हणुन.
०३	श्री. बी.एस.चोपडे, शिपाई, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बुलडाणा यांची आस्थापना.	जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे आस्थापनेवर जिल्हा न्यायाधीश-४ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बुलडाणा यांचे न्यायालयात रिक्त पदी शिपाई म्हणुन.
०४	श्री. जे.एस.राजपुत, शिपाई, मुख्य न्यायदंडाधिकारी, बुलडाणा यांची आस्थापना.	जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे आस्थापनेवर जिल्हा न्यायाधीश-४ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बुलडाणा यांचे न्यायालयात रिक्त पदी शिपाई म्हणुन.

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम	नवीन नियुक्ती व स्थळ
*०५	श्री. जी.आर.राजपुत, शिपाई, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांची आस्थापना.	मुख्य न्यायदंडाधिकारी, बुलडाणा यांचे आस्थापनेवर श्री. जे.एस.राजपुत यांचे पदी शिपाई म्हणुन.
*०६	श्री. ए.एस.शिंदे, शिपाई, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, संग्रामपुर यांची आस्थापना.	दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, चिखली यांचे आस्थापनेवर श्री. ए.आर.राऊत यांचे पदोन्नतीने रिक्त झालेल्या पदी शिपाई / पहारेकरी म्हणुन.
*०७	श्री. एम.एन.नावकार, शिपाई, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांची आस्थापना.	दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, शेगांव यांचे आस्थापनेवर श्री. पी.पी.देशपांडे यांचे पदी शिपाई म्हणुन.
*०८	श्री. पी.पी.देशपांडे, शिपाई, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, शेगांव यांची आस्थापना.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर श्री. एम.एन.नावकार यांचे पदी शिपाई म्हणुन.
०९	श्री. अभिषेक राजेंद्र राऊत, शिपाई पदाची प्रतिक्षा यादी (सन २०२३) मधील अनुक्रमांक ०२ वरील उमेदवार.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, खामगांव यांचे न्यायालयात श्री. व्ही.टी.बदरखे यांचे स्थलांतराने रिक्त झालेल्या पदी शिपाई म्हणुन नविन नियुक्ती.
१०	श्री. राहुल पुंडलिक बघेले, शिपाई पदाची प्रतिक्षा यादी (सन २०२३) मधील अनुक्रमांक ०३ वरील उमेदवार.	दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, संग्रामपुर यांचे आस्थापनेवर श्री. ए.एस.शिंदे यांचे पदी शिपाई म्हणुन नविन नियुक्ती.
११	श्री. धनंजय दत्तात्रय परिहार, शिपाई पदाची प्रतिक्षा यादी (सन २०२३) मधील अनुक्रमांक ०४ वरील उमेदवार.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवर सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, खामगांव यांचे न्यायालयात श्री. जी.आर.राजपुत यांचे पदी शिपाई म्हणुन नविन नियुक्ती.
१२	श्री. शैलेश नागोराव घनबहादुर, शिपाई पदाची प्रतिक्षा यादी (सन २०२३) मधील अनुक्रमांक ०५ वरील उमेदवार.	जिल्हा न्यायाधीश-१, खामगांव यांचे आस्थापनेवर श्रीमती एस.आर.सातव यांचे पदोन्नतीने रिक्त झालेल्या पदी शिपाई म्हणुन नविन नियुक्ती.

सदर्हू आदेश हा दिनांक ०६.०७.२०२६ रोजीचे मध्यान्हापुर्वपासून अंमलात येईल.

पदावनत व स्थलांतरीत कर्मचारी यांनी आपले पदाचा कार्यभार आजच दिनांक ०४.०७.२०२६ रोजीचे मध्यान्हानंतर दयावा व आपले नुतन पदी पदग्रहण अवधी न घेता दिनांक ०६.०७.२०२६ रोजीचे मध्यान्हापूर्व रुजू व्हावे.

जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक श्री. आय.आर.गायकवाड यांचे पद पुढील आदेशापावेतो रिक्त ठेवण्यात येत आहे. त्यांचे पदाचे काम श्री. पी.व्ही.अय्यर, वरिष्ठ लिपीक यांनी स्वत:चे पदाचे काम सांभाळून पहावे.

आस्थापना विभाग, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांना असे निर्देशित करण्यात येते की, मा. सल्लागार समितीने घेतलेल्या निर्णयानुसार श्री. के.बी.लकडे, कनिष्ठ लिपीक यांना शिपाई या पदी पदावनत करण्यात आले असून त्यांना त्यांच्या शिपाई या मुळ पदाच्या सेवाजेष्ठता यादीतील त्यांच्या पुर्वीच्या क्रमांकावर त्यांचे स्थान निश्चित करण्यात यावे. तसेच, त्यांच्या पदावनतीच्या पदाची म्हणजे शिपाई या पदाची नियमानुसार वेतननिश्चिती करण्यात यावी.

सदर्हु आदेश हा नवनियुक्त कर्मचाऱ्यांसाठी सुध्दा दिनांक ०६.०७.२०२६ रोजीचे मध्यान्हापुर्वपासुन अंमलात येईल.

नवनियुक्त उमेदवार यांना सुचित करण्यात येते की, त्यांची या आदेशाद्वारे करण्यात आलेली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता शासनाचे सेवेतून कमी करण्यात येईल. तसेच त्यांची नियुक्ती मा. उच्च न्यायालय, मुंबई व जिल्हा न्यायालयाच्या भविष्यात होणाऱ्या आदेशाला अधिन राहुन करण्यात आलेली आहे याची त्यांनी नोंद घ्यावी.

त्यांना पुढे असेही सुचित करण्यात येते की, त्यांनी दिनांक ०६.०७.२०२६ रोजीचे मध्यान्हापुर्वला किंवा त्यांना हा नियुक्तीचा आदेश मिळाल्यापासुन ०७ दिवसाचे आंत त्यांनी त्यांचे शिपाई पदी रुजु व्हावे. तसे करण्यास चुकल्यास त्यांचे नाव निवड यादीवरुन काढून टाकण्यात येईल व त्यांचा नियुक्तीचा आदेश हा रद्द करण्यात येईल.

उपरोक्त सन २०२३ चे शिपाई पदाची निवड यादीतील उमेदवारांची वेतननिश्चिती एस-१, वेतन बॅण्ड १५०००-४७६००/- या सुधारीत संरचनेत रुपये १५०००/- या मुळ वेतनावर निश्चित करण्यात येत आहे.

उपरोक्त उमेदवारांनी कामावर रुजु झाल्यानंतर त्यांचे तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणुकीचे बंधपत्र, एकनिष्ठतेचे शपथपत्र, वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि नियमानुसार आवश्यक ती

सर्व कागदपत्रे त्वरीत नेमणुकीच्या ठिकाणी सादर करावी. तसेच त्यांना त्यांचे पदाचा राजीनामा स्वत:हून दयावयाचा झाल्यास ०१ महिना अगोदर तशी नोटीस अथवा त्या ऐवजी ०१ महिन्याचे वेतन त्यांना भरुन दयावे लागेल.

संबंधित पिठासीन अधिकारी यांना असेही सुचित करण्यात येते की, नवनियुक्त उमेदवार हे त्यांच्या आस्थापनेवर रुजू होताक्षणीच त्यांचे कडून आवश्यक ते प्रतिज्ञापन घेवून व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ, दिनांक २८.०८.२०१७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना दोन प्रतीत घेण्यात येवून पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा न्यायालयास पाठवावे.

उमेदवारांनी चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबतचे साक्षांकन नमुन्यामध्ये सादर केलेली माहिती असत्य आल्याचे आढळुन आल्यास निर्गमित करण्यात आलेले तात्पुरते नियुक्तीपत्र हे रद्दबातल करुन भारतीय न्याय संहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल व प्रतिक्षा यादीवरुन नाव कमी करण्यात येईल.

उपरोक्त उमेदवारांना सुचित करण्यात येते की, त्यांनी शिपाई पदावर कर्तव्यावर हजर झाल्यानंतर पुरुष कर्मचाऱ्यांनी साधा पांढरा शर्ट, पांढरी पँन्ट व गांधी टोपी परिधान करणे अनिवार्य राहील.

(*) स्वेच्छेने स्थलांतर करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामामध्ये हलगर्जीपणा तथा निष्काळजीपणा आढळून आल्यास व प्रशासनास आवश्यकता भासल्यास, त्यांचे स्थलांतर इतरत्र कोठेही व केव्हाही होवू शकते, त्यांना "मी *आत्ताच बदलुन आलेलो आहे, माझी बदली पुढील पाच वर्षांपर्यंत होवु नये*" असे म्हणण्याचा अधिकार राहणार नाही तसेच त्यांचे स्थलांतर विनंती अर्जानुसार करण्यात आल्यामुळे त्यांना प्रवासभत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय नाही.

अनुक्रमांक ०१ व ०२ वरील स्थलांतरीत कर्मचाऱ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी आपले पदाचा सविस्तर कार्यभार पिठासीन अधिकारी यांचे मार्फत जिल्हा न्यायालयास आदेश दिनांकापासुन एक महिन्याचे आत सादर करावा.

(श्रीचंद दौ. जगमलानी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

पृष्ठांकन क्रमांक/आस्था./ ३५५८/२०२६, दिनांक : ०४/०७/२०२६
प्रतिलिपी माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाही करीता रवाना.

१. मा. प्रबंधक (कार्मीक), उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

७/७/२०२६
(श्रीचंद दौ. जगमलानी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

०१. जिल्हा न्यायाधीश-१, खामगांव.
०२. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बुलडाणा / खामगांव.
०३. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, संग्रामपुर / शेगांव / चिखली.
०४. श्री. अभिषेक राजेंद्र राऊत, रा. तुळशीनगर, साई क्लासेस जवळ, सागवण परिसर, बुलडाणा ता.जि. बुलडाणा ४४३ ००१ (नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह)
०५. श्री. राहुल पुंडलिक बघेले, रा. मु.पो. घिर्णी ता. मलकापुर, जि. बुलडाणा ४४३ १०२ (नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह)
०६. श्री. धनंजय दत्तात्रय परिहार, रा. मु. धोडप, पो. डोंगरशेवली, ता. चिखली, जि. बुलडाणा ४४३ ००१ (नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह)
०७. श्री. शैलेश नागोराव घनबहादुर, रा. मु. वनोजा, पो. चिंचोली बु., ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती ४४४ ७०५ (नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह)
०८. अधिक्षक (कार्यव्यवस्थापन / तांत्रिक विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.
०९. सहायक अधिक्षक (आस्थापना / वित्त व लेखा विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.
१०. वरिष्ठ लिपीक (वेतन देयक / सेवानिवृत्ती प्रकरणे / प्रवास भत्ता), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.
११. अध्यक्ष / सचिव, जिल्हा न्यायालयीन कर्मचारी पत संस्था, खामगांव.
१२. सहायक, संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदरचा आदेश वेबसाईट / ई-मेल वर टाकावा.
१३. कार्यालय प्रत.